भोर येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ सर,जि.पुणे यांचे न्यायालयात

रे.दि.मु.नं.७४/२०२४

श्रीमती रेणुका देवदत पन्हाळकर — वादी

विरूध्द

१. श्री. दशरथ जगन्नाथ पन्हाळकर
२. श्री. रामचंद्र अनु सावळे — प्रतिवादी

याकामी प्रतिवादी क्रं. १ व २ यांचे तर्फे वादी यांचे दाव्यास कैफियत व नि.नं. ५ चे निरंतर मनाई अर्जास जबाब देण्यात येतो, तो खालीलप्रमाणे

१. वादीचा दावा व त्यासोबत दिलेला निशाणी नं. ५ चा अर्ज हा बनावट स्वरूपाचा असून तो या प्रतिवादी नं. १ व २ यांना मुळीच मान्य व कबुल नाही.

२. सदरील दाव्यात दावा मिळकतीमधील सर्व आवश्यक त्या पक्षकार यांना सामील करून घेतलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास Non joinder of necessary Party या तत्वाची बाधा येत आहे.

३. सदरील दाव्याची आकारणी हि चुकीची केलेली असून दावा मिळकतीच्या दाखल चतु:सिमा या चुकीच्या दाखल केलेल्या आहेत. तसेच सदर दावा दाखल करण्यास वादीस कोणतीही Locus standy नाही.

४. वादी यांनी दाव्यामध्ये दाखल केलेले मिळकतीचे वर्णन व चतु:सिंमा या संदिग्ध स्वरूपाचे असून वादीस निश्चित काय व कोणत्या स्वरूपाची दाद मागावयाची आहे याचा स्पष्ट बांध होत नाही. त्यामुळे वादी यांचा दावा व नि.नं.प चा अर्ज कायदयाने चालणार नाही. यास्तव दावा व नि.न.५ चा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

५. वादी यांनी कलम १ मध्ये नमुद केलेनुसार वादी व प्रतिवादी क्रं.२ हे नातेसंबंधाने वहिणी व दिर आहेत. हे बरोबर असुन प्रतिवादी क्रं. १ याने प्रतिवादी नं. २ यांना

Read and Record
JADHAV MEENA WAMAN
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2024.11.25 17:24:18 +0530
Jt. C.J.J.D Bhor

Scanned with ACE Scanner

घर बांधकामासाठी त्यांचे सामाईक मालकी हक्काची जमिन घर बांधकामासाठी बेकायदेशीर दिलेली आहे ही बाब मान्य नाही. उलट वादी यांनी प्रतिवादी क्रं. १ यांची सामाईक मालकी हक्काची जमिन आहे. हे कलम १ मध्ये मान्य व कबुल केलेले आहे.

६. वादी यांनी दाव्यातील कलम २ मधील घर मिळकत क्रं. २३४ व लगतची जागा हि व त्याचे दाखल चतु:सिमा या चुकीच्या दाखल केलेल्या आहेत. तसेच या वादी यांनी मे. कोर्टापासुन खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून केवळ या प्रतिवादी यांचे गरीब मोकळया स्वभावाची फायदा घेवून त्यांना मानसिक, आर्थिक त्रास देणेचे हेतुने तसेच या प्रतिवादी यांचे कडून सोन्याचे दागिने घेण्याचे दृष्ट हेतुने प्रेरित होवून सदरचा खोटा व बनावट स्वरूपाचा दावा तसेच तत्पूर्वी या प्रतिवादी यांस मा.वकील महोदय यांचे मार्फत नोटीस पाठविलेल्या आहेत. ने या प्रतिवादींना त्यांचे अज्ञानपणामुळे, गरीबीमुळे त्यांचे वेळेत उत्तरही देता आलेले नाही त्यामुळे मुददा क्रं. २ हा प्रतिवादी यांना मान्य नाही.

७. दावा कलम ३ नुसार वादी या संगमनेर या गावी सध्या राहत नसून दाव्यातील नमुद पत्यावर भायंदर पश्चिम ठाणे येथे वास्तव्यास आहेत. तसेच मौजे संगमनेर येथील घर व जमिन मिळकती गट नं. ३८७ याबाबत वहिवाटीप्रमाणे आपापले ताब्यात व वहिवाटीस व ताबे कब्जात आहेत असे स्पष्टपणे नमुद करीत आहेत. त्यामुळे सदरील दाव्यातील घर मिळकत व जमिन गट नं. २८५, ३८७ हे वादी यांचे पती देवदत्त जगन्नाथ पन्हाळकर, दिर एकनाथ जगन्नाथ पन्हाळकर तसेच प्रतिवादी नं. १ दिर, दशरथ जगन्नाथ पन्हाळकर यांचे हयातील आपापसांतील तोंडी वाटप व वहिवाटीनुसार स्वतंत्रपणे घर मिळकती अनुक्रमे घर मिळकत नं. २३२ दशरथ जगन्नाथ पन्हाळकर व पत्नी कौशल्या जगन्नाथ पन्हाळकर २. घर मिळकत नं. २३३ एकनाथ जगन्नाथ पन्हाळकर व पत्नी सरूबाई एकनाथ पन्हाळकर तसेच घर मिळकत नं. २३४ देवदत्त

Scanned with ACE Scanner

जगन्नाथ पन्हाळकर व पत्नी रेणुका देवदत्त पन्हाळकर यांचे नावे स्वतंत्रपणे ८ अ उतारे सदरी दाखल आहेत. त्याप्रमाणेच जागेवर प्रत्यक्ष ताबा व कब्जा वहिवाट असून कोणीही कोणाचे घर मिळकत वहिवाटीस अडथळा निर्माण केलेला नव्हता व नाही. तसेच शेतजमीन गट नं. ३८५, ३८७ यामध्ये सुध्दा शांततामय आपापसांतील तोंडी वाटपानुसार वहिवाट सुरू असून त्यामध्ये भात, घेवडा, ज्वारी, याप्रमाणे पीके घेवून कुटुंबाचा स्वतंत्रपणे उदरनिर्वाह करीत आहेत.

८. दावा कलम ४ मध्ये प्रतिवादी क्रं. १ यांनी प्रतिवादी क्रं. २ यांना बेकायदेशीर घर बांधकामासाठी सामाईक मालकी हक्काची जमिन मिळकत दिलेली आहे हे कथन तसेच त्यासोबत दाखल कथन हे साफचुकीचे खोटे असून या प्रतिवादी क्रं. १ व २ यांस मान्य व कबुल नाही. कारण दावा कलम ३ मध्ये स्वत: वादी यांनीच घर मिळकत नं. २३२ हा प्रतिवादी क्रं. १ यांचे घर मिळकत असेलबाबत नमुद केलेले असून प्रत्यक्षात ग्रामपंचायत संगमनेर रेकॉर्ड सदरी प्रतिवादी क्रं. १ त्यांची पत्नी कौशल्या यांची नावे भोगवटादार दार म्हणून स्वतःअशी नमुद आहे. त्यामुळे सदर कलम ४ मधील सर्व कथन खोटे व बनावट स्वरूपाचे आहे.

९. दावा कलम ५, ६ मधील कथन हे अंशत: चुकीचे असून खरी वस्तुस्थिती वादी यांना या मे. कोर्टपासून लपवून ठेवलेली आहे.

मौजे संगमनेर येथील घर मिळकत नं. २३२ ही प्रतिवादी क्रं. १ व त्यांची पत्नी यांचे नावे दाखल आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्रं. १ यांचे जुने दगड, मातीचे घर बांधकाम हे मोडकळीस आलेले होते. ते केव्हाही पडून जिवित व वित हाणी होण्याची दाट शक्यता होती. यास्तव ते दुरूस्त करून स्वत:चेच मिळकत क्रं. २३२ मध्ये नविन घर बांधलेले आहे. तसेच सदर प्रतिवादी क्रं. १ यांना १ मुलगा दिपक जगन्नाथ पन्हाळकर हा असून तो विवाहित आहे. तसेच प्रतिवादी क्रं. १ व २ हे नात्याने व्याही

Scanned with ACE Scanner

आहेत. म्हणजेच प्रतिवादी नं. २ याची मुलगी प्रतिवादी नं. १ यांचे मुलाची पत्नी आहे. प्रतिवादी नं. २ यांना शासनाकडील घरकुल योजनेकडून घर बांधकामासाठी आर्थिक लाभ मंजुर झालेला होता. त्यांचे नावे जागा नसलेने माझे मालकीचे व ताबे वहिवाटीचे घर मिळकत नं. २३२ मधीलच काही क्षेत्र घर बांधकामासाठी करार स्वरूपाने दि. १२/१२/२०२२ रोजी प्रतिवादी नं. २ यांना दिलेले आहे. त्यानुसार घर मिळकत नं. २३२ मधील क्षेत्रातच व प्रतिवादी क्र. १ यांचे घरालगतच घरकुल योजनेतून घर बांधकाम केलेले आहे. तसेच सदर घरामध्ये प्रतिवादी क्र. १ यांचा मुलगा व सून प्रतिवादी क्र. २ यांची मुलगी हेच राहत आहेत. कारण प्रतिवादी क्र. २ यांना १ मुलगा व १ मुलगी अशी अपत्ये असून मुलगा पुणे येथे नोकरीस आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ हे त्यांचे सोबत कुटुंबासह पुणे येथे राहतात. यास्तव वादी यांचे असणारे घर मिळकत नं. २३४ हि प्रतिवादी यांचे घराचे मागील म्हणजेच पश्चिम बाजुस असून घर मिळकत नं. २३२ हि स्वतंत्र आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ यांना त्यांचे नावे दाखल मिळकत नं. २३२ चा करारनामा प्रतिवादी क्र. २ यांना करून देण्याचा पूर्ण हक्क व अधिकार असून वादी यांची संमती घेण्याची आवश्यकता नाही. तसेच शेतजमीन गट नं. ३८५, ३८७ हया सामाईकात दाखल असून भाउ हिश्याप्रमाणे व तोंडी वाटपानुसार वहिवाटीस आहेत.

१०. दावा कलम ७,८,९,१०,११ मधील कथन हे चुकीचे व खोटे आहे. या प्रतिवादी क्र. १ व २ यांस मान्य व कबुल नाही. त्यामधील खरी वास्तव परिस्थिती अशी आहे की, वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये घर मिळकत नं. २३४ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी अतिक्रमण व बेकायदेशीर घराचे बांधकाम केलेबाबत नमुद केलेले आहे. हि बाबच मुळात चुकीची व या मे. कोर्टाची दिशामुळ करणारी आहे. कारण सदर मिळकत नं. २३४ मध्ये वादीने त्यांचे पती देवदत्त जगन्नाथ पन्हाळकर यांचे नाव दखल आहे.

Scanned with ACE Scanner

तसेच मिळकत नं. २३२ हि प्रतिवादी क्रं. १ व त्यांची पत्नी यांचे नावे दाखल आहे. त्यामध्ये वादी यांचा कोणताही हक्क वा अधिकार नाही तसेच सदरील घर मिळकत नं. २३२, २३३, २३४ हया देवदत्त दशरथ व एकनाथ जगन्नाथ पन्हाळकर यांचे आपापसांतील तोंडी वाटपानुसार स्वतंत्रपणे ताबे वहिवाटीस आहेत. तसेच या वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये हि बाब की, प्रतिवादी नं. १ यांचे नावे दावा कलम १, ३ मध्ये कबुल केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्रं. १ यांनी त्यांचेच घर मिळकत नं. २३४ मध्ये स्वतःचे घराची डागडुजी करून नविन घर बांधकाम केलेले असून त्यालगतच लागूनच त्यांचा मुलगा व सून यासाठी स्वतंत्र घराचे बांधकाम घरकुल योजनेतून बांधलेले आहे. सदरील मिळकत व शेतजमीन याबाबत कोणताही नोंदणीकृत वा हस्तांतरणाचा व्यवहार त्रयस्थ इसमांस केलेला नाही.

११.. प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नव्हते. व नाही. याउलट वादी यांनी प्रतिवादी नं. १ व २ मध्ये यांचे घर दुरूस्ती व घरकुलाचे बांधकाम करीत असताना नाहक विनाकारण त्यांना कोणताही हक्क व अधिकार नसताना कामात अडथळा आणत होते. त्यामुळे प्रतिवादी नं. १ यांनी मा.ग्रामसेवक ग्रा.पं. संगमनेर यांजकडे दि. ५/१/२०२४ रोजी लेखी अर्ज करून सदरचे घर मिळकतींचे संदर्भात मा. तंटामुक्ती अध्यक्ष व पंच यांचे मध्यस्थीने आपापसातील वाद मिटलेला असून त्यानुसार या वादी यांना त्यांचे घर मिळकत नं. २३४ लगतची मोकळी जागा पंचासमक्ष दिलेली आहे. ती मान्य व कबुल असताना तसेच त्यांचे असणारे हिश्याच क्षेत्रात कोणतेही अतिक्रमण बांधकाम केलेले नाही. अशा आशयाचे पत्र या प्रतिवादी यांनी ग्रामपंचायत संगमनेर यांना दिलेले होते व आहे.

१२. सदर वादी या प्रतिवादी यांस नाहक मानसिक आर्थिक यांस देणेचे उदेदशाने तसेच कोणतीही खातरजमा व गैरसमजूती मधून केलेले आहेत. प्रस्तुत प्रतिवादी यांस

Scanned with ACE Scanner

गावी इतर कोणतीही घर मिळकत नसून घर मिळकत नं. २३२ एवढीच मिळकत त्यांचे नावे व रहिवासासाठी आहे. त्यामुळे या प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी त्यामध्येच घराचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. त्यामुळे वादी यांना प्रस्तूतचा दावा व नि.नं. ५ चा अर्ज फेटाळण्यात यावा.

तरी प्रतिवादी क्रं. १ व २ यांची विनंती की, मे. कोर्टास नम्र विनंती की,

अ. वादी यांचा प्रस्तूतचा दावा व त्यासोबत नि.नं.५ चा तुर्तातुर्त व निरंतर मनाई साठीचा अर्ज हा खर्चासह फेटाळण्यात यावा हि नम्र विनंती आहे.

ब. वादी यांनी प्रस्तूतचे दाव्यामध्ये आवश्यक त्या व्यक्तींना पक्षकार म्हणून सामील केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा व नि.नं.५ यांस Non joinder of necessary Party या तत्वाची बाधा येत असलेने सदरचा दावा व नि.नं. ५ चा अर्ज फेटाळण्यात यावा.

क. वादी यांनी प्रस्तुत प्रतिवादी क्रं. १ व २ यांना नाहक त्रास देणेचे दृष्ट हेतुने सदरचा खोटा, लबाडीचा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे वादी यांजकडून प्रतिवादी यांस कॉम्पेनसेंटरी कॉस्ट म्हणून रक्कम रू. ५०,०००/— देण्याचा हुकुम करण्यात यावा.

ड. आवश्यकता भासल्यास प्रतिवादी यांना प्रस्तुत कैफियत व जबाब यामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी असावी.

इ. इतर योग्य व न्यायाचे हुकुम व्हावेत. ही विनंती.

भोर

दि. २५/११/२०२४

१. [signature]

प्र.वादी नं. १

२. प्रतिवादी नं २ रामचंद्र अनु [illegible] यांचा ड. [illegible] नं. आहे.

Scanned with ACE Scanner